# प्रसिद्धी विभाग

## शैक्षणिक वर्ष २०१८ – १९

## **राष्ट्रीय सेवा योजना विभाग**

लोकमत पुणे, बुधवार, दि. १२ सप्टेंबर २०१८

### केरळ पूरग्रस्तांसाठी मदत निधीचे संकलन

लोकमत न्यूज नेटवर्क

राजगुरुनगर : हुतात्मा राजगुरु महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने केरळ पूरग्रस्तांसाठी सुमारे २८ हजार ५०० रुपयांहून अधिक मदत निधीचे संकलन करण्यात आले. अतिवर्षण व पूरग्रस्त केरळमधील उद्ध्वस्त झालेले जनजीवन आणि नैसर्गिक व मानवी मालमत्तेची झालेली अपरिमित हानी, या पार्श्वभूमीवर पूरग्रस्तांच्या मदतीसाठी निधी संकलन करण्यात आले.

या प्रसंगी खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष ॲड. देवेंद्र बुट्टे-पाटील, उपाध्यक्ष नानासाहेब टाकळकर, प्राचार्य डॉ. एस. बी. पाटील, कला शाखेचे उपप्राचार्य डॉ. संजय शिंदे, प्रा. दिलीप मुळूक उपस्थित होते. मदत निधी योजना यशस्वितेसाठी रासेयो कार्यक्रम अधिकारी प्रा. मच्छिंद्र मुळूक, प्रा. योगेश वाळुंज, प्रा. नीता डोंगरे, स्वयंसेवक मधुरा वाघ, पूजा सांडभोर, प्रतीक कराळे, निखिल बोरकर, शिव कदम, प्रगती मांजरे, पूनम मेदगे, सुनील वायकर, विद्या ठोंबरे, धनंजय वाटेकर यांनी विशेष परिश्रम घेतले.



महाविद्यालयाच्या वतीने केरळ पूरग्रस्तांसाठी मदतीचे संकलन करण्यात आले.

जनप्रवास ५
गुरुवार, दि. २७ सप्टेंबर २०१८

### राजगुरु महाविद्यालयाच्या वतीने केरळ पूरग्रस्तांसाठी मदतनिधीचे संकलन

राजगुरूनगर | वार्ताहर

येथील हुतात्मा राजगुरु महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने केरळ पूरग्रस्तांसाठी सुमारे अठ्ठावीस हजार पाचशे रूपयांहून अधिक मदतनिधीचे संकलन करण्यात आले. अतिवर्षण व पूरग्रस्त केरळमधील उद्ध्वस्त झालेले जनजीवन आणि नैसर्गिक व मानवी मालमत्तेची झालेली अपरिमित हानी या पार्श्वभूमीवर पूरग्रस्तांच्या मदतीसाठी निधी संकलन करण्यात आले. राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने सर्व विद्यार्थ्यांना सामाजिक भावनेतून मदतीचे आवाहन करण्यात आले. विद्यार्थ्यांनीही या आवाहनाला चांगला प्रतिसाद दिला. हा निधी सावित्रीबाई पुणे विद्यापीठाच्या कुलगुरु निधीत जमा करण्यात आला. या प्रसंगी खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष ॲड. देवेंद्र बुट्टेपाटील, उपाध्यक्ष नानासाहेब टाकळकर, प्राचार्य डॉ.एस.बी.पाटील, कला शाखेचे उपप्राचार्य डॉ. संजय शिंदे, प्रा.दिलीप मुळूक उपस्थित होते. मदतनिधी योजना यशस्वीतेसाठी रासेयो कार्यक्रम अधिकारी प्रा.मच्छिंद्र मुळूक, प्रा.योगेश वाळुंज, प्रा.नीता डोंगरे, स्वयंसेवक मधुरा वाघ, पूजा सांडभोर, प्रतिक कराळे, निखिल बोरकर, शिव कदम, प्रगती मांजरे, पूनम मेदगे, सुनिल वायकर, विद्या ठोंबरे, धनंजय वाटेकर यांनी विशेष परिश्रम घेतले.



राजगुरूनगर येथीलहुतात्मा राजगुरु महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने केरळ पूरग्रस्तांसाठी मदतनिधीचे संकलन करण्यात आले.

केसरी पुणे, २८ सप्टेंबर २०१८

# केरळ पूरग्रस्तांसाठी मदतनिधीचे संकलन

**राजगुरुनगर, (वार्ताहर) :** येथील हुतात्मा राजगुरु महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने केरळ पूरग्रस्तांसाठी सुमारे अठ्ठावीस हजार पाचशे रुपयांहून अधिक मदतनिधीचे संकलन करण्यात आले. अतिवर्षण व पूरग्रस्त केरळमधील उद्ध्वस्त झालेले जनजीवन आणि नैसर्गिक व मानवी मालमत्तेची झालेली अपरिमित हानी या पार्श्वभूमीवर पूरग्रस्तांच्या मदतीसाठी निधी संकलन करण्यात आले. राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने सर्व विद्यार्थ्यांना सामाजिक भावनेतून मदतीचे आवाहन करण्यात आले. विद्यार्थ्यांनीही या आवाहनाला चांगला प्रतिसाद दिला. हा निधी सावित्रीबाई पुणे विद्यापीठाच्या कुलगुरु निधीत जमा करण्यात आला. या प्रसंगी खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष ॲड. देवेंद्र बुट्टेपाटील, उपाध्यक्ष नानासाहेब टाकळकर, प्राचार्य डॉ.एस.बी. पाटील, कला शाखेचे उपप्राचार्य डॉ. संजय शिंदे, प्रा.दिलीप मुळूक उपस्थित होते.

मदतनिधी योजना यशस्वीतेसाठी रासेयो कार्यक्रम अधिकारी प्रा.मच्छिंद्र मुळूक, प्रा.योगेश वाळुंज, प्रा.नीता डोंगरे, स्वयंसेवक मधुरा वाघ, पूजा सांडभोर, प्रतिक कराळे, निखिल बोरकर, शिव कदम, प्रगती मांजरे, पूनम मेदगे, सुनिल वायकर, विद्या ठोंबरे, धनंजय वाटेकर यांनी विशेष परिश्रम घेतले.

डॉ. संजय शिंदे
प्रसिद्धी विभाग प्रमुख